# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 04/11/2022 (शुक्रवार) सकाळ

---

### घरफोडी

**पो.स्टे. बोरी** :– अंतर्गत ०२ कि.मी. अंतरावरील मौजा रेवतकर ले आउट फ्रेन्डस कॉलनी, बुटीबोरी येथे दिनांक ०२/११/२०२२ ते ०३/११/२०२२ चे १४.३० वा. ते ०७.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– रविंद्र रमेशराव भगत, वय ३८ वर्ष, रा. प्लॉट नं १२, रेवतकर ले आउट फ्रेन्डस कॉलनी, बुटीबोरी हे घराला लॉक लावुन गावी गेले असता घरी परत आल्यावर कोणीतरी अज्ञात चोराने घराचे कुलुप तोडुन घराचे सामान अस्तव्यस्त करून आलमारी मधुन १) एक सोन्याची अंगठी वजनी ३.७५ ग्रॅम कीमती अंदाजे १००००/– रू. २) नथनी वजनी ०१.७५ ग्रॅम कीमती अंदाजे ३०००/– रू ३) एक जोडी झुमक्याचे कानातले वजनी ०३.७५ ग्रॅम कीमती अंदाजे १२०००रू/– ४) चार पायपट्टया ४० ग्रॅम ३०००/–रू. व चिल्लर नगदी ५०००/– रूपये असा एकुण ३३०००/– रूपयाचा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस स्टेशन बोरी करीत आहे.

### दुखापत

**पो.स्टे. मौदा** :– अंतर्गत १५ कि.मी अंतरावरील दिघोरी काळे येथे दिनांक ०३/११/२०२२ चे ००.०५ ते ००.३० वा दरम्यान फिर्यादी नामे– शाम राजु धुर्वे वय २४ वर्ष. रा. दिघोरी काळे ता. कामठी जि. नागपुर हे गावातील इलेक्ट्रीक लाईन गेल्यामुळे फिर्यादी घराच्या बाहेर निघाले असता तेव्हा फिर्यादीच्या घराचे थोडया अंतरावर गावातील यातील आरोपी क्र. 1) शाम लांडे २) रिंकेश चिचुडे ३) प्रविण सेलोटे ४) अभिजित टोंडरे, सर्व रा दिघोरी काळे. ता. कामठी जि. नागपुर हे बसलेले होते व त्यांची आपसात हसीमजाक चालु होती. तेव्हा फिर्यादीने त्यानां हटकले कि, ‘‘रात्र झाली आहे लोक झोपले आहे विनाकारण ओरडु नका’’ तेव्हा शाम लांडे म्हणाला, ‘‘तेरे को जादा समज रहा है क्या, तु यहा का बदमाश है क्या’’ असे म्हणुन फिर्यादीचे अंगावर धाऊन आला व शिविगाळ करुन त्याचे हातातील लोखंडी पाईपने मारण्यास सुरवात केली व आरोपी क्र. ४ ने पकडुन ठेवले व आरोपी क्र.२, ३, ने हाथ बुक्याने मारहाण केली फिर्यादी खाली पडले. व नंतर त्यांचे तावडीतून सुटुन पळून गेले. त्यांचे मारहाणीत फिर्यादीचे डोक्याला लागले व रक्त निघाले, उजव्या पायाला मार लागुन सुज आली, तसेच डाव्या हाथाला व चेहऱ्यावर सुद्धा मार लागला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 324, 504, 34 भांदवि. भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस स्टेशन मौदा करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**